बुधवार, दि ९ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ४ था ● किमंत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# महिला सक्षमीकरणासह सर्व समाजघटकासाठी महायुती सरकारने कामे केली - खा. डॉ. श्रीकांत शिंदे

केंद्रात आणि राज्यात सरकार असतांना शासकीय वैद्यकिय महाविद्यालय कुणी आणले हे सांगायला ज्योतिषी लागत नाही; आ. गोरंट्याल यांच्यावर टिका






**जालना । प्रतिनिधी -** महिला सक्षमीकरणासह सर्व समाजघटकासाठी महायुती सरकारने कामे केली असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीसोबत रहा असे आवाहन खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी येथे केले. ते जनसंवाद यात्रे निमित्ताने जालना येथे आले असता मामा चौक पसिरात झालेल्या विराट जनसमुदायास संबोधीत करतांना त्यांनी हे आवाहन केले. त्याचबरोबर केंद्रात एनडीएचे सरकार आणि महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे कुणी आणले किंवा मंजुर केले हे सांगायला ज्योतिषी लागत नाही हे सांगतांनाच माजी राज्यमंत्री खोतकर यांनी मेडीकल कॉलेजसह विविध उद्योगधंद्यांसाठी राज्याकडे पाठपुरावा केला असल्याचेही ते म्हणाले. यावेळी व्यासपीठावर खा. संजय निरुपम, माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, युवा सेनेचे अभिमन्यू खोतकर, पंडीत भुतेकर, विष्णु पाचफुले आदींची उपस्थिती होती. प्रसंगी जिल्ह्यातील विविध पक्षातील पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

यावेळी बोलतांना डॉ. शिंदे म्हणाले की, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना व लेक लाडकी योजनेच्यामाध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिला सक्षमीकरणाचे काम केले आहे. लाडकी बहिण योजनेची घोषणा झाल्यानंतर आता पाचवा हफ्ताही खात्यात जमा झाला आहे. यापुर्वी कोणत्याही सरकारने असा निर्णय घेतला नाही जो निर्णय मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतलेला आहे. अठरा-अठरा तास काम करणार मुख्यमंत्री आपण पाहतो आहोत, यापुर्वीच्या इतिहासत राज्याने असा मुख्यमंत्री कधी पाहिला नाही. हा एक रेकार्ड असल्याचेही डॉ. शिंदे म्हणाले.

शेतकऱ्यांसाठी विविध योजना महायुती सरकारने राबविलेल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी साडेसात एचपीपर्यंतची वीज माफी या सरकारने दिली आहे. त्यांना आता शुन्य वीजबिल येणार आहे. यापुर्वी असे कधीही घडलेले नाही. त्याच बरोबर कृषि पंप सोलार योजना आहे, समृद्धी महामार्गाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना या सरकारने करोडपती केले आहे. राज्यातील एक गाव तर फॉच्युनर नावावे प्रसिद्ध झाले असल्याचेही डॉ. शिंदे यांनी सांगितले हे सरकार देणारे सरकार आहे घेणारे नाही. सर्व समाज घटकासाठी या सरकारने काम केले आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीसोबत रहा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जालन्यातील शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाचे श्रेय घेत असल्याबाबत श्री खोतकर यांनी त्यांच्या भाषणातून डॉ. शिंदे यांना स्पष्टीकरण देण्याचे आवाहन केले होते यावरही डॉ. शिंदे यांनी आ. कैलास गोरंट्याल यांच्यावरही टिका केली. डॉ. शिंदे म्हणाले की, केंद्रात आपले सरकार आहे, राज्यात आपले सरकार आहे. तर वैद्यकिय महाविद्यालय कुणी आणले हे सांगायला कुण्या ज्योतिषीची गरज नाही, या वैद्यकिय महाविद्यालयासाठी माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी पाठपुरावा केला असल्याचा दावा देखील डॉ. श्रीकांत शिंदे यांनी जाहीर सभेत केला आहे. काँग्रेस खोटा प्रचार करते, नरेटीव्ह पसरवतेय, जाती-जाती पान २ वर

# हरियाणाची महाराष्ट्रात पुनरावृत्ती होणार - खा. शिंदे

प्रत्येक पक्ष दावा करतो; निर्णय वरिष्ठ पातळीवरील नेते घेणार

**जालना । प्रतिनिधी -** राहुल गांधी जेथे जातात तेथे जाती-पातीत, धर्मात तेढ निर्माण करण्याचे काम करत आहेत. लोकसभा निवडणुकीतही त्यांनी हेच केले. हरियाणा विधानसभेतही त्यांनी तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्या फेक नरेटिव्हला हरियाणाच्या जनतेने नाकारले असून तेथे भाजपाचा विजय झाला आहे. त्याच पद्धतीने महाराष्ट्र राज्यातही अशा फेक नरेटिव्हला येथील जनता स्थान देणार नाही व हरियाणाची पुर्नरावृत्ती महाराष्ट्रात होईल, महायुती पुन्हा सरकार राज्यात स्थापन होणार असल्याचा विश्वास खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी येथे व्यक्त केला.

शिवसेना शिंदे गटाची जनसंवाद यात्रा सध्या सुरू असून त्यानिमित्ताने मंगळवार (दि ८) रोजी जालना येथे खा. डॉ. श्रीकांत शिंदे आले होते. त्यावेळी पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांची उपस्थिती होती.



डॉ. शिंदे म्हणाले की, गांधीच्या फेक नरेटिव्हमुळे लोकसभेत जागा कमी झाल्या असतील, मात्र, नरेंद्र मोदींवरील विश्वास वाढल्यामुळे तिसऱ्यांना केंद्रात एनडीएचे सरकार स्थापन झाले. हरियाणाच्या निकालाचा फायदा महाराष्ट्रात होईल, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, यांच्या नेतृत्तात मागील दोन वर्षात विविध योजना राबविण्यात आल्या आहेत. तळागाळापर्यंत सरकार पोहचले आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना, लेक लाडकी योजना, शेतकऱ्यांसाठी साडेसात एचपीपर्यंत वीज माफी, युवा कार्यक्रम प्रशिक्षण योजना, कृषि पंप सोलार, समृद्धी महामार्ग, कोस्टल रोड आदी विविध योजना या सरकारने राबविल्या असल्याचेही डॉ. शिंदे यांनी येथे सांगितले.

देशात इंफ्रास्टक्चर, स्टार्टमध्ये महाराष्ट्र नंबर एकवर आहे, केंद्राकडे मागणी केल्यानंतर राज्याला भरघोस निधी देण्यात येतो. नुकतेच अमित शहा यांचा राज्यात दौरा झाला त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांसाठी १४00 कोटी रुपयांचे अनुदान देऊन गेले. एनडीआरएफचे निकष बाजुला ठेवून सरकार शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे टाकले आहे.

काँग्रेसने जे फेक नरेटिव्ह पसरविण्याचे काम केले त्याला हरियाणाच्या जनतेने नाकारले असून तेथील जनतेचे डॉ शिंदे यांनी धन्यवाद मानले. त्याचीच पुर्नरावृत्ती राज्यात होणार आहे.

जागा वाटपासंदर्भात विचारल्या गेलेल्या प्रश्नावर डॉ. शिंदे यांनी पान २ वर

# अन्यथा हॉर्न बनवणेच बंद करावे लागेल

हायकोर्टाचा गंभीर इशारा

**मुंबई -** आता वाहनांचे हॉर्न बनवणे बंद करावे लागेल, त्याशिवाय ध्वनी प्रदूषण आटोक्यात येणारच नाही असे मत मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवार (दि ८) रोजी व्यक्त केले आहे. हॉर्नच्या आवाजामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होत आहे. ज्या गोष्टी धोकादायक आहेत त्याची निर्मिती थांबवणे हाच पर्याय आता शिल्लक आहे. प्लॅस्टिक हे पर्यावरणासाठी घातक आहे. आता माशांच्या पोटातही प्लास्टिक जमा होत आहे. त्यामुळे कमी मायक्रॉनचं प्लास्टिक बनवणेच बंद करायला हवे असा सल्लाही यावेळी हायकोर्टाने दिला आहे.

नवरात्र उत्सवात उल्हासनगर परिसरात होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाविरोधात स्थानिक समाजसेविका सरीता खानचंदानी यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली.

मोठ्या आवाजाची तक्रार करण्यासाठी उल्हासनगरमध्ये एक खास टोल फ्री क्रमांक सुरु करण्यात आला आहे. या क्रमाकांची जाहिरात वृत्तपत्रात देण्यात आली आहे. सोशल मिडियावर या क्रमांकाची माहिती देण्यात आली आहे, असे यावेळी पालिकेच्या वतीने हायकोर्टाला सांगण्यात आले आहे.

उल्हासनगरमधील शाळेतील मुलांना ध्वनी प्रदूषणाच्या दुष्परिणांमाची माहिती द्या, जेणेकरुन ते आईवडिलांना सांगतील की आवाज कमी ठेवत जा. याचिकाकर्त्या सरीता खानचंदानी यांनीदेखील शाळेतून जनजागृती पान २ वर

युवा आदर्श | जालना | बुधवार, दि ९ ऑक्टोबर २०२४ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com


# संपादकीय

## बिग बॉस विजेत्या सूरज चव्हाणचा प्रेरणादायी प्रवास

कलर्स मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या बिग बॉस या रिलिटी शो चा ग्रँड फिनाले रविवारी रंगला आणि या अपेक्षेप्रमाणे सूरज चव्हाण हा या रिलिटी शो चा विजेता ठरला. सूरज चव्हाण या शो चा विजेता ठरावा अशी प्रेक्षकांची ईच्छा होती कारण अल्पावधीतच त्याने प्रेक्षकांच्या मनात घर केले होते. त्याचा भोळसट स्वभाव आणि निरागस वागणूक यामुळे प्रेक्षक त्याच्या प्रेमात पडले होते. मनोरंजन क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकार या शो मध्ये त्याचे प्रतिस्पर्धी होते त्यामुळे त्याला कोणीच जमेस धरले नव्हते. टीकटॉक वर स्वतः चे काही सेकंदाचे व्हिडिओ बनवून टाकणारा सूरज चव्हाण हा या शो चा विजेता ठरेल असे सूरज वगळता कोणालाच वाटले नव्हते. सूरजला मात्र स्वतः वर विश्वास होता आणि याच विश्वासाच्या जोरावर तो विजेता ठरला. काहीही करून हा शो जिंकायचाच असा विचार करून तो शो मध्ये उतरला आणि त्याने स्वतः ला सिद्ध केले. सूरज बिग बॉस चा विजेता ठरला असला तरी त्याचा इतपर्यंत चा प्रवास सोपा नव्हता. बारामती येथे जन्म लेल्या सूरज चव्हाणचे बालपण अतिशय खडतर अवस्थेत गेले. सूरज चव्हाण लहान असतानाच त्याचे आई वडील वारले. लहानपणीच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सूरज चव्हाणचा सांभाळ त्याच्या मोठ्या बहिणीने केला. त्याला एकूण पाच बहिणी आहेत. घरची परिस्थिती हालाखीची असल्याने आठवितच सूरजला शाळा सोडून द्यावी लागली. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने एक वेळचे जेवण मिळणे देखील मुश्कील त्यामुळे कित्येकदा तो उपाशी किंवा अर्धपोटीच झोपत असे. पोटाची खळगी भरण्यासाठी त्याने मंदिरातील नैवद्य खाऊन दिवस काढले. किशोर वयातच त्याला सोशल मिडियाचे वेड लागले. इतर मुलांसारखे तो ही टिक टॉक या सोशल मीडिया साईट वर स्वतःचे व्हिडिओ काढून टाकू लागला. अल्पावधीतच त्याचे व्हिडिओ लोकप्रिय झाले आणि बघता बघता तो महाराष्ट्रात फेमस झाला तो त्याच्या आगळ्या वेगळ्या शैलीने, त्याचे डायलॉग अक्षरशः वाऱ्या सारखे व्हायरल झाले. गुलिगत धोका, बुक्कित टेंगुळ, झापुक झुपुक, मरीआई पावली या सारखे त्याचे कितीतरी डायलॉग हिट झाले आणि तो टिक टॉक स्टार झाला. टिक टॉक यू ट्यूब कडून त्याला पैसेही मिळाले पण सुरुवातीला त्याच्या भोळ्या स्वभावामुळे ते त्याच्या पर्यंत पोहचले नाही तरीही त्याची काही तक्रार नव्हती. तो त्याचे व्हिडिओ, रिल्स बनवून प्रेक्षकांसमोर येतच होता. त्याची लोकप्रियता वाढतच होती. त्याच्या याच लोकप्रियतेचा फायदा घेण्यासाठी कलर्स मराठी वाहिनीने त्याला बिग बॉस शो ची ऑफर दिली. सुरुवातीला सूरज बिग बॉसच्या घरात यायला तयार नव्हता. पण कलर्स वाहिनीने त्यांचा हट्ट सोडला नाही अखेर सूरज चव्हाण बिग बॉसच्या घरात यायला तयार झाला आणि आज सूरजने थेट बिग बॉसच्या ट्रॉफी वर नाव कोरत इतिहास घडवला. काही जण त्याच्या या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून म्हणतात की बिग बॉस प्रि प्लेंड होतं पण तळागाळातील सर्वसामान्य मुलासाठी कोण प्लॅन करणार ? कोण त्याचा एवढा विचार करणार ? ते पण एवढ्या मोठ्या कसलेल्या कलाकारांसमोर. सूरज चव्हाण त्याच्या कष्टाच्या आणि जिद्दीच्या बळावर ईथवर पोहचला आहे. आता त्याच्या कष्टाचे चीज झाले असे म्हणावे लागेल. बिग बॉस विजेत्या सूरज चव्हाणचे मनापासून अभिनंदन !

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# विधानसभेत बदनापूरला त्रिकुटाशिवाय चेहरा हवा - अॅड. भास्कर मगरे

## मेळाव्याला भुमिहिन कास्तकरांची मोठी उपस्थिती



**बदनापूर । प्रतिनिधी -** अंबड-बदनापूर विधानसभा मतदार संघातील त्रिकुटाला जनता कंटाळली असून त्रिकुटाशिवाय चेहरा आता मतदार संघात हवाय, असे शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख अॅड. भास्करराव मगरे म्हणाले. मी गेली २० वर्षापासून दलित आदिवासी भुमिहिन, बेघर, निराधारांची व इतर समाज घटकांची अहोरात्र सेवा करीत असून बदनापूर-अंबड मतदार विधानसभा मतदार संघ हा सन २००९पासून अ.जा.साठी आरक्षित आहे. मात्र या ठिकाणी अ.जा. मधील खरा चेहरा मिळाला नाही, जो स्वतः ला कधीच अ.जा.मधील घटक मानीत नाहीत. त्यांना अ.जा.च्या भावना आणि जातीमुळे बसणारे चटके कसे कळणार, बदनापूर-अंबड हा पुर्वी शिवसेनेचा बालेकिल्ला होता. आजही आहे. २००९ ला चुकीच्या माणसाला उमेदवारी मिळाली तरी सुध्दा आमदार केले. मात्र त्याला लोकांच्या भावना कधी कळाल्याच नाहीत. म्हणून २०१४ ला परजिल्ह्यातील उमेदवार लोकांनी आमदार केला, असल्याचे शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख अॅड. भास्कर मगरे यांनी म्हटले आहे.

शिवसेना दलित आघाडी, भुमिहिन,कास्तकर, बेघरांचा बदनापूर तालुका स्तरीय मेळाव्यात बोलत होते. पुढे बोलतांना शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख अॅड. भास्कर मगरे म्हणाले की,सध्याचा निक्रिष्य आमदार असून सुध्दा दुसर्यांदा आमदार झाला. कारण प्रतिस्पर्धी हा हिंदी भाषिक असल्याने दुसरी संधी मिळाली आणि म्हणून २००९ ला झालेला आमदार जनतेने फेकून दिला. आता १० वर्षे आमदार असलेला अत्यंत निष्क्रीय ठरला आणि पंधरा वर्षे हिंदी भाषिक असलेला जनतेने नाकारले तरी सुध्दा या त्रिकुटाचीच चर्चा बदनापूर-अंबड विधानसभा मतदार संघात होतांना दिसत आहे. मात्र ही चर्चा त्रिकुटाशिवाय दुसरा नवीन चेहरा निवडुन देण्याची मानसिकता जनतेमध्ये दिसून येत आहे. या नवीन प्रैश चेहर्यामध्ये शिवसेना दलित आघाडीचे जालना जिल्हाप्रमुख भुमिपुत्र असलेले आणि दलित आदिवासी भुमिहिन कास्तकरांच्या आंदोलनातून घरा-घरात पोहोचलेले अॅड. भास्कर मगरे हाच चेहरा होऊ शकतो असा सुर बदनापूर -अंबड विधानसभा मतदार संघात पहायला मिळत आहे. यापुढे जावून अॅड. भास्कर मगरे यांनी जालना जिल्हा शिवसंपर्क सामाजिक अभियान जिल्ह्यातील गाव, वाडी, तांडा वस्तीपर्यंत घेवून गेले आहेत. आणि केंद्र-राज्य शासनाच्या समाजहिताच्या जनकल्याणकारी योजनांचा विनामुल्य लाभ मिळवून देण्यात आला आहे. यामुळे त्रिकुटा शिवाय प्रैश चेहरा हाच होऊ शकतो अशी जनतेची भावना अॅड. भास्कर मगरे यांनी बोलून दाखविली.

**अहोरात्र कामे, मतदार संघाचा संपुर्ण अभ्यास**

बदनापूर-अंबड विधानसभा मतदार संघाचा पुर्ण अभ्यास अवगत आहे. मागील काही वर्षांपासून या मतदार संघात स्थानिकचा आमदार मिळत नसल्याने मतदार संघाचा विकास खुंटला आहे. मी शिवसेना दलित आघाडीच्या माध्यमातून बदनापूर-अंबड विधान सभा मतदार संघातच नव्हे तर अवघ्या जिल्हाभरात गोर-गरीबांची अहोरात्र कामे करण्याचा वसा मी घेतलेला आहे. तो कायम चालूच ठेवणार आहे. येणार्या काळात बदनापूर विधानसभा मतदार संघात नागरिकांनी व मतदारांनी मला संधी दिल्यास नक्कीच या मतदार संघाचा विकास करुन दाखेवल अशी भावनाही अॅड. भास्करराव मगरे यांनी बोलून दाखवली. यावेळी प्रमोद साबळे, रामचंद्र पंडीत, ज्ञानेश्वर साबळे, रवी रगडे, मनोज मगरे, वसंत दाभाडे, भिमाबाई पंडीत, कौसाबाई साबळे, छबाबाई गायकवाड यांच्यासह शेकडो भुमिहिन कास्तकर, आदीवासीं यांच्यासह तालुक्यातील मोठ्या संख्येने पदाधिकार्यांची उपस्थिती होती.

**पान १ व ४ वरुन**

### महिला सक्षमीकरणासह ...

तेढ निर्माण करते, धर्मात तेढ निर्माण करते आहे त्यांना बळी पडू नका असे आवाहनही डॉ. शिंदे यांनी यावेळी केले.

यावेळी माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी राज्य सरकारने केलेल्या विकास कामांचा पाढा वाचला. लाडकी बहिण योजना, लेक लाडकी, युवकांसाठीच्या योजना, शेतकऱ्यांसाठीच्या योजनाबद्दल श्री खोतकर यांनी सांगितले. त्याचवेळी जालना शहरातील समस्यांकडेही त्यांनी डॉ. शिंदे यांचे लक्ष वेधले. वैद्यकिय महाविद्यालयाचे येथे श्रेय भलतेच लोक घेताहेत म्हणत आ. गोरंट्याल यांच्यावर टीका करत श्री खोतकर यांनी डॉ. शिंदे यांना वैद्यकीय महाविद्यालय कोणी मंजुर केले कोणी आणले हे आपणच जनतेसमोर स्पष्ट करा असे आवाहन यावेळी केले. जालन्यातील वक्फ बोर्डचा मुद्दा, जालनेकरांना सध्याही आठ दिवसाआड पाणी मिळते म्हणत पिण्याच्या पाण्याची समस्याही त्यांनी मांडली. शंभर कोटींची सोलार योजना जालनेकरांसाठी मंजुर करुन द्यावी अशी सादही त्यांनी यावेळी डॉ. शिंदे यांना घातली.

**उत्स्फुर्त प्रतिसादने भारावले डॉ. श्रीकांत शिंदे**

जनसंवाद दौऱ्यानिमित्ताने जालना येथे असलेले खा. डॉ. श्रीकांत शिंदे मंगळवार सकाळपासूनच एका हॉटेलमध्ये बैठकांवर बैठका घेत होते. या बैठकानंतर पत्रकार परिषदेत त्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिले. तेथून डॉ. शिंदे यांनी थेट जालना पोस्ट ऑफीस गाठत मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींची आस्तेवाईकपणे चौकशी केली. त्यानंतर शहरातील विविध ठिकाणी झालेल्या सत्कार आणि त्यानंतर मामा चौक येथे झालेली विराट सभा पाहिल्यानंतर डॉ. श्रीकांत शिंदे हे भारावून गेले होते.

### हरियाणाची महाराष्ट्रात ...

जागा वाटप हे तिन्ही पक्षाचे वरिष्ठ नेते मिळून निर्णय घेणार असल्याचे स्पष्ट केले तसेच जालना विधानसभेवर भाजपाने दावा केला याबाबत डॉ. शिंदे म्हणाले की, प्रत्येक पक्ष हा दावा करत असतो, प्रत्येकाला वाटते की आपण या ठिकाणाहून लढलो पाहिजे; निवडून येऊ शकतो, कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांची भावना निर्माण होते. निवडणुकीत असे होत असते, त्यामुळे असे दावे होतात. मात्र, निर्णय तिन्ही पक्षाचे नेते घेतील व ते जे उमेदवार देतील तो उमेदवार जालना विधानसभेतून निवडून आणण्यासाठी महायुती प्रयत्नशील असेल असेही शेवटी डॉ. शिंदे म्हणाले.

**जालना विधानसभेत खोतकर मेहनत करताहेत - डॉ. शिंदे**

येथे अर्जुनराव खोतकर गेल्या अनेक वर्षापासून येथे काम करताहेत, पक्ष संघटना वाढविण्याचे कार्य ही त्यांच्या कार्यकाळात येथे होत आहे. त्याच बरोबरच वेगवेगळे उद्योगधंदे, मेडीकल कॉलेज बाबतीत खोतकर यांनी पाठपुरावा केला. जालना विधानसभेत खोतकर मेहनत करताहेत असेही डॉ. शिंदे यावेळी म्हणाले.


### अन्यथा हार्न ...

करावी. पालिका व पोलिसांनीही त्यांना यात मदत करावी, असंही न्यायालयाने आपल्या निर्देशांत स्पष्ट केले आहे.

उल्हासनगर रेल्वे स्थानकाजवळ व अन्य परिसरात रिक्षाच्या हॉर्नमुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होते. ध्वनी प्रदुषण रोखण्यासाठी रिक्षा चालकांमध्ये वाहतूक पोलिसांनी जनजागृती करावी. कारण शहर पोलिसांवर कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असते, असे खंडपीठाने नमूद केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : अॅड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com




# महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४ चा निकाल घोषित

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि पु ल देशपांडे कला अकादमीच्या वतीने घेण्यात आलेल्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४ चा निकाल घोषित करण्यात आला आहे. राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार भारत माता गणेश मंडळ, देवनांदरा, जि. परभणी, द्वितीय पुरस्कार जय भवानी मित्र मंडळ, ठाणे व तृतीय पुरस्कार वसुंधरा वृक्षरुपी गणेशोत्सव, लातूर यांना जाहीर झाला आहे. राज्यातील पहिला क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळास पाच लाख, द्वितीय क्रमांकास दोन लाख ५० हजार आणि तृतीय क्रमांकास रुपये एक लाख इतक्या रकमेचे पारितोषिक, सन्मानाचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय उर्वरित ३३ जिल्ह्यांसाठीही जिल्हा निहाय पारितोषिक विजेते जाहीर करण्यात आले आहेत. जिल्हास्तरीय पारितोषिकाचे स्वरूप रुपये २५००० प्रत्येकी, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र असे आहे. जिल्हास्तरीय निकाल सोबत जोडला आहे. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ श्री सुधीर मुनगंटीवार, मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षीय उपस्थितीत आणि शुभ हस्ते बुधवार, ता. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात येणार आहे. यशवंत नाट्यमंदिर, माहीम, मुंबई -१६ येथे दुपारी बारा वाजता हा पारितोषिक वितरण समारंभ आहे.

# रावसाहेब दानवे यांच्या प्रयत्नांतून मंजुर कामांचे भास्कर दानवे यांच्या हस्ते उदघाटन व लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी -** मौजपुरी गावामध्ये सन २०२२-२३ या वर्षामध्ये खासदार निधी अंतर्गत नालीसह सी. सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी ७ लक्ष्य रूपये, सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष्य रूपये, २५१५ योजनेंतर्गत सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी ४ लक्ष्य रूपये, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी ५ लक्ष्य रुपये असा एकून २६ लक्ष्य रुपयांचा निधी तसेच सन २०२३-२४ या वर्षामध्ये ३०५४ योजनेंतर्गत रामा २ ते मौजपुरी रस्त्याची सुधारणा करण्यासाठी १५ लक्ष्य रूपये, दलित वस्ती योजनेंतर्गत दलित वस्तीमध्ये लाईट बसविण्यासाठी ५ लक्ष्य रूपये, जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४, पूर नियंत्रण अंतर्गत संरक्षण भिंत बांधण्यासाठी ४० लक्ष्य रूपये, प्रधानमंत्री




ग्राम सडक योजनेंतर्गत भिलपुरी ते उटवद रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी २९४ लक्ष्य रूपये निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता यावेळी या सर्व पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण करण्यात आले.

तसेच खासदार निधी अंतर्गत नालीसह सी. सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी ७ लक्ष्य रुपये, ९५०५ योजनेंतर्गत सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष्य रुपये, ९५०५ योजनेंतर्गत जि.प. शाळेसमोर पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी १० लक्ष्य रुपये, संभाजी चौकामध्ये पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी १० लक्ष्य रूपये, दलित वस्ती योजनेंतर्गत समाज मंदिर बांधकाम करण्यासाठी ७ लक्ष्य रूपये, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत योजनेंतर्गत सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी ५ लक्ष्य रूपये, धनगर वस्ती योजनेंतर्गत जयमल्हार धनगर वस्ती क्र.१ येथे सी.सी. रोड व भूमिगत नाली बांधकाम करण्यासाठी ५ लक्ष्य रूपये, २५१५ योजनेंतर्गत सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी ४ लक्ष्य रूपये, जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ पूर नियंत्रण अंतर्गत संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठी २० लक्ष्य रूपये, प्रादेशिक पर्यटन योजना सन २०२४ अंतर्गत श्री क्षेत्र रामेश्वर महादेव मंदिर परिसरात विविध विकास कामे करण्यासाठी ४०० लक्ष्य रूपये, मातोश्री पाणंद रस्ता योजनेंतर्गत मंठा हायवे ते काळे वस्तीपर्यंत रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी २० लक्ष्य रूपये, गमा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री योजनेंतर्गत ग्रा.पं. इमारत बांधकाम करण्यासाठी २५ लक्ष्य रुपयांचा निधी रावसाहेब दानवे यांच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आला होता, यावेळी या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी बोलताना भास्कर दानवे यांनी सांगितले कि, मौजपुरी गावात मागील २ वर्षात ९ कोटीहून अधिक रुपयांचा निधी विविध विकासकामांसाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, हि विकासकामे मा. रावसाहेबदादा दानवे यांच्या नेतृत्वात निरंतर होतच राहतील, यापुढेही आपल्या मौजपुरी गावाला कधीही कुठल्याही प्रकारचा निधी कमी पडू दिला जाणार नाही असे आश्वासन यावेळी दिले. जालना जिल्हह्यात नवीन जालना-जळगाव रेल्वे, ड्राय पोर्ट सारखे मोठे प्रकल्प येत आहेत त्यांच्यामुळेच आज जालना शहर देशाचा नकाशावर झळकत आहे, अजिंठा-बुलढाणा, जालना-वडिगोद्री यांसारखे प्रमुख रस्ते त्याच प्रमाणे भारतमाला योजनेअंतर्गत बांधण्यात येणारा ६ पदरी जालना-संभाजीनगर यांसारखे जवळपास ६००० कोटींचे रस्ते दादांच्या माध्यमातून बांधण्यात आले आहेत असे सांगितले.

याप्रसंगी युवा मोर्चाचे जिल्हाअध्यक्ष भागवत बावणे, तालुका अध्यक्ष वसंतराव शिंदे, अनिल सरकटे, संजय डोंगरे, मुकेश चव्हाण, विजू मोहिते, कृष्णा गायके, काकासाहेब घुले, विष्णू मोहिते, महादेव मोहिते, शंकर काळे, दत्ता जाधव, संदीप बोरुडे, निवृत्ती लंके, शिवाजी राठोड, महेश मुळे, नारायण मोहिते, प्रदीप पोहेकर, विकास मोहिते, ज्ञानेश्वर राठोड, अतुल चव्हाण, राजाभाऊ कळकुंभे, अर्जुन मोहिते, हरिभाऊ गोरे, गोपाल चौधरी, रामजी शेजुळ, लहू राठोड, पांडुरंग गायकवाड, निवृत्ती गायकवाड, बद्री भसांडे, पांडुरंग डोंगरे, विष्णू डोंगरे, बंडू काळे, सोनजी खडेकर, नारायण डोंगरे, प्रल्हाद मोरे, राम जाधव, अनिल शिंदे, अण्णासाहेब थोरात, रामदास गायकवाड, संतोष मोरे, शाम देशम ुख, ज्ञानेश्वर काळे, राम भसांडे, उत्तम पोहेकर, समाधान हिवाळे, सुनील मोरे, राम थोरात यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

# राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचा जालना जिल्हा दौरा

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. बुधवार दि.९ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी २.४५ वाजता हेलिकॉप्टरने जालना येथील पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर आगमन व राखीव. दुपारी २.५० वाजता पोलिस मुख्यालय येथून शासकीय विश्रामगृह जालनाकडे प्रयाण करतील. दुपारी २.५५ वाजता शासकीय विश्रामगृह जालना येथे आगमन व राखीव. दुपारी ३ ते ५ या वेळेत शासकीय विश्रामगृह जालना येथे संवाद, सोईनूसार रात्रीचे जेवण व मुक्काम ासाठी राखीव राहतील. गुरुवार दि.१० ऑक्टोबर रोजी सकाळी ९.४० वाजता शासकीय विश्रामगृह येथून पोलिस मुख्यालयाच्या मैदानावरील हेलिपॅडकडे प्रयाण. सकाळी ९.४५ वाजता पोलिस मुख्यालय मैदानावरील हेलिपॅड येथे आगमन व राखीव. सकाळी ९.५५ वाजता हेलिकॉप्टरने हिंगोलीकडे प्रयाण करतील.

# श्रीष्टी तांडा येथील रोहयो कामांमध्ये गैरव्यवहार; चौकशीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील मौजे श्रीष्टी तांडा येथे रो.ह.यो.अंतर्गत करण्यात येत असलेल्या कामांमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असून या काम ांची सखोल चौकशी करावी अशी मागणी बादल राठोड यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात पुढे म्हटले आहे की, श्रीष्टी येथे रोजगार हमी योजने अंतर्गत सिंचन विहिर, पांदन रस्ते, शेततळे, इत्यादी कामे मंजूर करण्यात आली असून सदर कामे मजुरांच्या माध्यमातून करणे गरजेचे असतांना जेसीबीच्या सहाय्याने केली जात आहे.त्यामुळे गावातील मजुरांच्या हाताला काम मिळत नसल्याने मजुरांसह त्यांच्या कुटुंबातील सदस्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.यंत्रांच्या सहाय्याने काम करून बोगस मजूर दाखवली जात असल्याचा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे. या सर्व कामांची चौकशी करून सदर कामे स्थगीत करावी व संबंधितावर योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी बादल राठोड यांनी केली आहे. याप्रकरणी चौकशी न झाल्यास आपल्या कार्यालया समोर अमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा देखील बादल राठोड यांनी या निवेदनात दिला आहे.

# जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी अबरार साहेल यांची निर्दोष मुक्तता

**जालना प्रतिनिधी-** गोदावरी शिक्षण संस्थेच सचिव अबरार साहेल ताहेरमियों सौदागर यांची जातीवाचक शिवीगाळ प्रकरणी केल्या प्रकरणी निर्दोष मुक्ता जिल्हा व सत्र न्यायाधिश एस.आर. ताबोंळी यांनी केली. प्रस्तुत वि. सत्र खटला क्र.९८/२०२० याचा निकाल दि. ०३/१०/२०२४ रोजी देण्यात आला. प्रकरण असे आहे की, दिनांक ११/१२/२०१९ रोजी फिर्यादी बाई यांचे संस्थेमार्फत चौकशीचे प्रकरण संस्थेच्या कार्यालयात सुरू होते. पंरतु या चौकशी दरम्यान संस्थेच सचिव सौदागर यांनी जातीवाचक शिवीगाळ केल्या प्रकरणी फिर्यादी ने पोलीस स्टेशन कदीम जालना येथे अनुसुचित जाती जमाती प्रतिबंधक कायदा चे कलम ३ (१) (आर), ३(१) (एस), नुसार येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता व याचा तपास डि वाय एस पी सुधीर खिरडकर यांनी तपास करून दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले होते. प्रस्तुत प्रकरणात न्यायालयामध्ये एकूण ०६ साक्षीदार तपासले तसेच सरकार पक्षातर्फे फिर्यादीचे सुध्दा साक्षपुरावा पडताळण्यात आला. प्रकरणामध्ये न्यायालयात आलेला पुरावा व अॅड. मुजम्मील शेख व अॅड. राहूल चव्हाण यांनी आरोपी तर्फे युक्तवाद व तसेच सर्व साक्षीदाराचा उलट तपास घेऊन न्यायालयासमोर आरोपीची निर्दोष बाजू समोर आणली. यामध्ये पुरावा व न्यायनिवाडे तपासून आरोपीची निर्दोष मुक्तता केली.



**जनसंवाद दौऱ्यावर जालना येथे असतांना खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी जालना पोस्ट ऑफीसमध्ये दाखल होत महिलांची आस्तेवाईकपणे चौकशी केली. लाडकी बहिण योजनेचे किती हफ्ते जमा झाले, पैसे मिळताहेत की कसे असे प्रश्न विचारत भविष्यात ही योजना अशीच सुरु राहणार म्हणत डॉ. शिंदे यांनी महिलांना आश्वस्त केले.**

## परतूर-मंठा मतदार संघातील आळंदीत राहणाऱ्या मतदारांचा कौटुंबिक स्नेहमेळावा

# संधी दया सोने करून दाखवेल माजी आ. सुरेशकुमार जेथलिया

**परतूर । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मंठा, नेर, सेवली, परतूर मतदार संघातील पुणे,आळंदी परिसरात कामानिमित्त गेलेल्या हजारो मतदारांची मा.आ. सुरेशकुमार जेथलिया यांनी आळंदी येथे स्नेह मिलनाचा कार्यक्रम आयोजित करत भेट घेतली.

यावेळी त्यांच्या सह परतूर काँग्रेस तालूका अध्यक्ष बाबासाहेब गाडगे , मंठा तालुका अध्यक्ष नीळकंठ वायाळ,अण्णासाहेब खंदारे , किसनराव मोरे, गणेश महाराज आवजी, सुधीर भाऊ मुंगसे, निळकंठ वायाळ, सुखलाल राठोड, संतोष पवार, दत्तप्रसाद बनसोडे, बाबुराव हिवाळे,इंद्रजीत घनवट, विष्णुपंत बोराडे, माऊली तनपुरे, माऊली वायाळ, सूर्यभानजी मोरे, निळकंठ तौर,सिद्धेश्वर सोळंके, प्रफुल्ल शिंदे, रमेश जाधव, विष्णुपंत बाहेकर ,विनायक बाहेकर ,अप्पासाहेब चव्हाण, राजेश भुजबळ, अविनाश शहाणे,रहेमु कुरेशी अकबर शेठ, मंजूळदास सोळंके, पंजाब देशमुख, शाकीर भाई, गौतम सदावर्ते,आसाराम चोरमारे,दादाराव हिवाळे, दामोदर कदम,श्रीकांत महाराज, अवचार ,विवेक घारे, चैतन्य भैया वाघमारे, अंकुश म हाराज पाटोदा ,लहू महाराज हातवन, नितीन महाराज, माऊली महाराज




शिवनगिरी, लक्ष्मण महाराज,शुभम महाराज मंठा ,मंगेश महाराज नांद्रा, प्रल्हाद महाराज कदम, ज्ञानेश्वर महाराज कदम दिलीपराव पवार उद्योजक पांगरी, सिद्धेश्वर आंभुरे, सुरेश जिजा सवणे, महादेव घेंबड, गजानन ढाकणे,सुरेश तुरेराव, दिगंबर इंगळे, सुहास राठोड, दत्ता अंभूरे , भगवान आघाव यांच्या सह अनेक मान्यवाराची उपस्तिथी होती.

आपल्या मतदार संघातील नेता आपल्याला भेटायला पुणे परिसरात आला या इच्छुकतेने या परिसरातील परतूर म तदार संघातील मतदार भराऊन गेले.

आळंदी येथील फ्रुटवला ट्रस्ट येथे संपन्न झालेल्या या मेळाव्यात हजारोच्या संख्येने मतदारांची उपस्तिथी होती. यावेळी मतदाराना आवाहन करताना मा.आ.सुरेशकुमार जेथलिया म्हणाले कि आपल्या मतदार संघातील हजारो लोक पुणे, मुंबई, नाशिक सह मोठ्या शहरात गेलेले आहेत. यात काही नोकरीं निम्मित गेले हरकत नाही पण बरेच मतदारांनी केवळ पोटाची खळगी भरण्यासाठी आपली कर्म भूमी सोडली यांचे खरंच दुःख वाटते. कारण परतूर मतदार संघात खऱ्या अर्थाने विकास झाला नाही. नागरिकांच्या मूलभूत गरजा पुरवण्यात सरकार व सत्ताधारी व्यवस्था अपयशी पडत आहे. म्हणून ग्रामीन माणसाचा लोंढा मोठा संख्येने आपले गाव सोडण्यात मजबूर होतांना दिसत असल्याची वास्त्यविकता त्यांनी स्पष्ट केली. हे समीकरण बदल्यासाठीच तर यावेळी राज्यातील सरकारला जनतेनेच धडा शिकवण्याचा निर्णय घेतला असल्याचे ते म्हणाले. मला संधी दया मी आपल्या मतदार संघातील विकास खऱ्या अर्थाने करून दाखवेल अशी ग्वाही देत याच आळंदीत आपण विजयी मेळावा साजरा करू अशा भावना त्यांनी शेवटी व्यक्त केल्या. दरम्यान यावेळी येथील म तदारांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले कि आजवर एवढ्या दूर येऊन आपल्या मतदार संघातील नेत्याने कधीच भेट घेऊन अस्थेने विचार पूस केली नाही मात्र मा.आ.सुरेशकुमार जेथलिया यांनी आमची भेट घेतली याबद्दल ते किती जागृत नेते आहेत हे स्पष्ट होते. तुम्ही कामाला लागा आमची तुम्हाला साथ आहे. या घोषनेने कार्यक्रम स्थळ दनाणून गेले होते.

यावेळी अनेकांनी आपल्या म नोगतात जेथलिया यांच्या कार्याचा व धार्मिक वृत्तीचा व कार्यकाळात झालेल्या विकासकामाचा उल्लेख केला.